# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

**क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२४-२५/२४६.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम २८(२)(न)[28(2)(t)] अन्वये दहा (१०) नोंदणीकृत पदवीधरांना निवडून देण्याकरीताच्या अंतिम मतदार यादी जाहीर प्रकटन क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२४-२५/२४०, दिनांक ३१ जुलै, २०२४ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच नोंदणीकृत पदवीधर मतदार संघाकरीता नामनिर्देशन अर्ज भरण्याबाबत निवडणूक अधिसुचना क्र.नि.वि./आय.सी.डी/२०२४-२५/२४३, दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

उपरोक्त अधिसुचनेनुसार नामनिर्देशन अर्ज मंगळवार दिनांक ०६ ऑगस्ट, २०२४ ते सोमवार दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत रूम नं. ११०, निवडणूक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२, येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी **(सुट्टीचे दिवस वगळून)** आवश्यक त्या कागदपत्रांसह जमा करावेत.

स्वाक्षरीत/-
(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : ०८ ऑगस्ट, २०२४
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.